संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
शाखा ____ क्रमांक 29689
दिनांक ३ 23/12/24
प्रशासकिय अधिकारी ____
____ अधिकारी ____
संचालक ____
आयुक्त ____

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार.

## GOVERNMENT MEDICAL COLLEGE, NANDURBAR

जिल्हा सामान्य् रुग्णालय परिसर, साक्री रोड, नंदुरबार-४२५४१२.
Website –htpp://gmchnandurbar.com, Phon No.(02564) - 210444, ई-मेल:- deangmchnandurbar@gmail.com

जा.क्र.शावैमनं/बांधकाम/प्रक.व्यवस्थाने बांधकामे/खाजगी जागा /4547 /२०२४ दि.16/12/2024

प्रति,
मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण),
आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन व आयुष,
मुंबई-४०० ००१

**विषय:- भूसंपादन प्रस्ताव क्र.०२/२०२४.**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नीत रुग्णांलय आणि इतर अनुषंगिक इमारतीचे बांधकामासाठी संपादित होणा-या क्षेत्राबाबत जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदीकामी जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्याबाबत...**

**संदर्भ:-** उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, नंदुरबार यांचे पत्र क्र.२०२४ / भूसंपादन/कावि/४६७, दि.१३.१२.२०२४.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणास सादर करण्यात येते की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नंदुरबार या संस्थेच्या नवीन बांधकामाच्या जागेवर १० गुंठे अतिरिक्त खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे थेट खरेदीकामी जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्याबाबतचे संदर्भीय पत्रानुसार आपण सदरील जाहिर प्रगटन आपले वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी सदरील पत्र आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येत आहे. तरी सदरील जाहिर प्रगटन आपल्या वेबसाईटवर प्रसिध्द करुन त्याबातचा प्रसिध्द केल्याबाबतचे पत्र या कार्यालयास पाठविण्यात यावे. जेणे करुन सदरील पत्र मा.जिल्हाधिकारी, नंदुरबार भूसंपादन कार्यालय यांना पाठविणे सुलभ होईल, ही विनंती.

आपला विश्वासु,

**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**नंदुरबार.**

**सोबत**-वरिल प्रमाणे

**प्रत** :- मा.जिल्हाधिकारी, (भूसंपादन विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत** :- M/s,.HITES, HLL Infra. Tech. Services Ltd. Mumbai यांना माहितीस्तव.

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी,
# नंदुरबार भाग, नंदुरबार यांचे कार्यालय.

ई मेल ... दूरध्वनी (02564) 210010

क्रमांक-2024 भूसंपादन कावि 467 2024

दिनांक 3/12/2024

प्रति,

अधिष्ठाता,

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार

**विषय** :- भूसंपादन प्रस्ताव क्र.०२/२०२४
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नीत रूग्णालय आणि इतर अनुषंगिक इमारतीचे बांधकामासाठी संपादित होणाऱ्या क्षेत्राबाबत जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदीकामी जाहिर प्रगटन प्रसिद्ध करणेबाबत.....

**संदर्भ**:- मा.जिल्हाधिकारी नंदुरबार यांचेकडील आदेश क्र.भुसंपादन/कावि-४४७/२०२४ दि.०३ डिसेंबर २०२४ अन्वये

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, मौजे टोकरतळे ता.जि.नंदुरबार येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नीत रूग्णालय आणि इतर अनुषंगिक इमारतीचे बांधकामासाठी संपादित होणाऱ्या क्षेत्राबाबत जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदीकामी जाहिर प्रगटनाची प्रत सोबत जोडलेली आहे. तथापि सदर जाहिर प्रगटनाची प्रत आपले विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून तसा अहवाल इकडेस सादर करण्यात यावा.

सोबत :- जाहिर प्रगटनाची प्रत

(गोविंद दाणेज)
उपविभागीय अधिकारी
नंदुरबार भाग, नंदुरबार तथा
भूसंपादन अधिकारी,नंदुरबार

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय, मुंबई अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नीत रुग्णालय आणि इतर अनुषंगिक इमारतीचे बांधकामासाठी खालील परिशिष्टात नमूद असलेल्या मौजे टोकरतलाव ता जि नंदुरबार येथील खाजगी शेतजमिनी मिळकती महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.एलक्यूएन ०१/२०१७/प्र.क्र.१२/अ.२ दि. २५ जानेवारी २०१७, थेट खरेदीद्वारे भूसंपादन करण्यात येत आहे. याबाबतचा प्रस्ताव अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार यांचेकडील पत्र जा.क्र.शावैमनं/बांधकाम प्र.क्र.व्यवस्थाने बांधकामे/जमीन अधिग्रहण/४१८२/२०२४ दि.१८ नोव्हेंबर २०२४ अन्वये मा.जिल्हाधिकारी नंदुरबार यांचेकडेस सादर करण्यात आलेला आहे.

त्यानुषंगाने, मा.जिल्हाधिकारी नंदुरबार यांचेकडील आदेश क्र.भूसंपादन/कावि ४४७/२०२४ दि.०३ डिसेंबर २०२४ अन्वये ज्याअर्थी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वस्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे खंड (ग) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी मा.सहा.जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नंदुरबार उपविभाग नंदुरबार यांना प्रस्तुत आदेशान्वये पदनिर्देशित केलेले आहे.

तरी खालील नमूद परिशिष्टातील शेतजमिनी मिळकतीसंबंधी इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, आक्षेप वा हक्क असल्यास, तो त्यांनी प्रस्तुतचे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संबंधित मूळ कागदपत्रांसहित लेखी स्वरूपात "उपविभागीय अधिकारी कार्यालय, नंदुरबार भाग नंदुरबार " या कार्यालयास कळवावे. मुदतीच्या आत कोणाचाही आक्षेप न आल्यास सदरील शेत मिळकत पूर्णपणे निर्विवाद, बोजेविरहीत व दोषमुक्त आहे असे समजून वर उल्लेखित व्यक्तीशी महाराष्ट्र शासनाच्या सक्षम अधिकारी यांच्या पूर्वपरवानगीने सदरील शेत मिळकतीच्या नोंदणीकृत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. उपरोक्त मुदतीनंतर आलेले आक्षेप बंधनकारक राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

शेत मिळकतीचे परिशिष्ट
मौजे टोकरतळे, ता. जि.नंदुरबार

| अ.क्र. | भूधारकाचे नाव (७/१२ नुसार) | ग.नं. | भूधारणा पद्धती | ग.नं.७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे अंदाजित क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | संजय नगीन चौधरी | ५७/१ | वर्ग-२ | १.९७<br>पोख.०.२८ आर | ०.१० |

यांस चतु:सिमा

| | |
|---|---|
| पूर्वेस | ग.नं.५८ |
| पश्चिमेस | ग.नं.५७ पैकी |
| दक्षिणेस | ग.नं.५७ पैकी |
| उत्तरेस | ग.नं.५६ |

दिनांक - १३/१२/२०२४

(गोविंदा दाणेज)
उपविभागीय अधिकारी
नंदुरबार भाग, नंदुरबार तथा
भूसंपादन अधिकारी,नंदुरबार